# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:27.08.2025** **वार:बुधवार**

---

1. लाडक्या गणरायांच्या आगमनाचा राज्यभरात जल्लोष.
2. कामगारविषयक कायद्यांमधे सुधारणा करुन महाराष्ट्र कामगार संहिता तयार करण्याच्या प्रस्तावाला राज्य मंत्रिमंडळाची मंजुरी
3. नांदेड मुंबई वंदे भारत रेल्वे मुळे मराठवाड्याच्या समृद्धीचं द्वार खुलं होणार, मुख्यमंत्र्यांचा विश्वास आणि
4. उच्च शिक्षण संस्थांमधल्या 21 शिक्षकांना राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार जाहीर; राज्यातल्या दोघांचा समावेश

**गणेशोत्सव**

महाराष्ट्राची सांस्कृतिक ओळख असलेल्या गणेशोत्सवाच्या चैतन्य पर्वाला आजपासून सुरुवात होत आहे. सर्वांच्या लाडक्या गणपती बाप्पाचं आज भाद्रपद शुद्ध चतुर्थीच्या शुभमुहूर्तावर आगमन होत आहे. यंदा गणेशोत्सवाला राज्य महोत्सवाचा दर्जा मिळाल्यानं गणेशोत्सवाचा उत्साह द्विगुणीत झाला आहे. राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी जनतेला गणेशोत्सवाच्या शुभेच्छा देत हा संदेश दिला आहे.....

**महाराष्ट्रातील आणि देशातील तमाम नागरिकांना गणेशोत्सवाच्या खूप शुभकामना आणि शुभेच्छा आम्ही देतो आहोत. महाराष्ट्र सरकारच्या वतीने यावर्षी विशेष प्रयत्नातून आपला गणेशोत्सव राज्य महोत्सव म्हणून आपण घोषित केला आहे. राज्य महोत्सव हा धूमधडाक्यात आपण साजरा करतो आहोत. नागरिकांना माझी विनंती आहे, आपली सहभागिता द्या, आपला महोत्सव, आपला गणराय, आपला गणेशोत्सव याचा आनंद द्विगुणित करूया आणि आपल्या सगळ्यांच्या आयुष्यातली जर काही विघ्न येऊ घातली असतील तर विघ्नहर्ता दूर करेल अशी अपेक्षा व्यक्त करूया.**

गणरायाच्या आगमनापासून ते विसर्जनापर्यंत उत्सव सुरळीत पार पाडण्यासाठी ठीकठिकाणचं स्थानिक प्रशासन, पोलीस यंत्रणा सज्ज झाल्या आहेत. सार्वजनिक गणेशोत्सवाची मोठी परंपरा पुण्याला लाभली आहे.....

**शतकोत्तर सुवर्ण महोत्सवाकडे वाटचाल करणाऱ्या, सार्वजनिक गणेशोत्सवाला राज्य सरकारनं, यंदा राज्य महोत्सवाचा दर्जा दिल्यामुळे सार्वजनिक गणेश मंडळात एक नवा उत्साह पहायला मिळत आहे. भाद्रपद महिन्यात, शुद्ध पक्षातल्या गणेश चतुर्थीला पार्थिव गणेशाची स्थापना करून, पुढे काही दिवस त्याची उपासना करण्याचे व्रत, परंपरेनं घरोघर सुरू होतं. या परंपरेला लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांनी सार्वजनिक स्वरूप देत, घराघरात होणारा हा उत्सव स्वातंत्र्यलढ्यासाठी सार्वजनिक स्वरूपात केला. पुणे शहराला सार्वजनिक गणेशोत्सवाची मोठी परंपरा लाभली असून मानाचे आणि प्रतिष्ठित असे गणपती पाहण्यासाठी राज्यभरातील भाविक पुण्यात येत असतात. पुण्यात असलेल्या अनेक गणपती मंदिरांमध्ये गेल्या रविवारी प्रतिपदेपासून भाद्रपदी गणेश जन्मोत्सव सुरू झाला आहे. आज या मंदिरांमध्ये आपापल्या प्रथेनुसार दुपारी किंवा संध्याकाळी गणेश जन्म कीर्तन होणार आहे. या उत्सवांची सांगता उद्या होईल. तर अनंत चतुर्दशी पर्यंत चालणाऱ्या सार्वजनिक उत्सवाला यंदा अकरा दिवस मिळाले आहेत. पारंपारिक देखाव्यांसह, समाज प्रबोधन करणारे, उद्बोधन करणारे जिवंत देखावे गेल्या काही वर्षांपासून सादर केले जात आहेत. ही परंपरा जपत असतानाच, डीजेचा दणदणाट, लेझरचा लखलखाट, लांबणाऱ्या विसर्जन मिरवणूका, उत्सवामुळे होणारी गर्दी आणि त्यामुळे होणारी वाहतूक कोंडी असे ओंगळवाणे स्वरूप उत्सवाला आलं आहे. ते सुधारणं ही देखील काळाची गरज झाली आहे.मंगलमूर्ती गणरायाच यासाठी सर्वांना सद्बुद्धी देतील, आकाशवाणी बातम्यांसाठी पुण्याहून सुहास देशपांडे.**

**मंत्रिमंडळ निर्णय**

राज्यातल्या कामगारविषयक कायद्यांमधे सुधारणा करुन महाराष्ट्र कामगार संहिता नियम तयार करण्याच्या प्रस्तावाला राज्य मंत्रिमंडळाने काल मंजुरी दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात झालेल्या या बैठकीत, विमुक्त जाती आणि भटक्या जमाती संवर्गातल्या लाभार्थ्यांना ओळखपत्रं, प्रमाणपत्रं तसंच विविध योजनांचा लाभ मिळवून देण्याची कार्यपद्धती प्रभावीरित्या राबवण्याचा निर्णयही या बैठकीत झाला. नागपूर-गोंदिया प्रवेश द्रुतगती महामार्गाला राज्य सरकारनं मान्यता दिली. महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियमांमध्ये सुधारणा, बीड जिल्ह्यातल्या आष्टीमध्ये न्यायालय स्थापन करण्यासाठी खर्चाला मान्यता, बीड जिल्ह्यातल्या तीन बंधाऱ्यांचा विस्तार यासारखे निर्णयही या बैठकीत झाले.

**वंदे भारत-नांदेड**

नांदेडला राजधानी मुंबईशी जोडणाऱ्या पहिल्या वंदे भारत एक्सप्रेसचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्रालयातून दूरस्थ पद्धतीनं हिरवा झेंडा दाखवून शुभारंभ केला. वंदे भारत एक्सप्रेस' मुळे नांदेड राजधानी मुंबईच्या अधिक जवळ आलं असून यामुळे निश्चितच मराठवाड्याच्या समृद्धीचं द्वार उघडलं आहे, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भारतीय रेल्वे कात टाकत असून वंदे भारत रेल्वे ही त्याचेच प्रतीक आहे, मुंबई ते नांदेड हे 610 किलोमीटरचे अंतर ही गाडी 9 ते साडे 9 तासात कापणार आहे. अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली.

**राष्ट्रीय पुरस्कार-मुंबई**

राष्ट्रीय शिक्षक पुरस्कारांसाठी उच्च शिक्षण संस्था आणि तंत्र शिक्षण संस्थांमधल्या 21 शिक्षकांची निवड झाली आहे. त्यात राज्यातल्या डॉक्टर नीलाक्षी जैन आणि प्राध्यापक पुरुषोत्तम पवार यांचा समावेश आहे. डॉक्टर जैन मुंबईतल्या शहा आणि अँकर कच्छी अभियांत्रिकी महाविद्यालयात, तर प्राध्यापक पवार बारामतीच्या एस.व्ही.पी.एम तंत्रज्ञान आणि अभियांत्रिकी संस्थेत अध्यापनाचं काम करतात.

**राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार-नांदेड**

केंद्र सरकारनं राष्ट्रीय शिक्षक पुरस्कारासाठी देशभरातून 152 शिक्षकांची निवड केली असून असून त्यामध्ये राज्यातल्या 3 शिक्षकांचा समावेश आहे. त्यात नांदेड जिल्ह्यातील अर्धापूर जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक डॉक्टर शेख मोहम्मद वकीउद्दीन शेख हमीदोद्दिन यांचा समावेश आहे. पुरस्कार जाहीर झाल्यानंतर त्यांनी आकाशवाणीकडे प्रतिक्रिया व्यक्त केली.....

**मला यंदाचा 2025चा राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झालेला आहे माझ्यासाठी हा क्षण अत्यंत अभिमानाचा आणि प्रेरणादायी आहे मला हा पुरस्कार मिळणे म्हणजे माझी वैयक्तिक कामगिरी नसून माझ्या शाळेतील सहकारी शिक्षक विद्यार्थी पालक आणि संपूर्ण समाजाचा विशेषतः अर्धापूरवासियांच्या सामूहिक प्रयत्नांची ही पावती आहे मी जिल्हा परिषद हायस्कूल अर्धापूरचा मुख्याध्यापक म्हणून नेहमीच विद्यार्थी केंद्रित शिक्षण नवन उपक्रम आणि शाळा व समुदायाचा सर्वांगीण विकास यावरच भर दिला आहे हा पुरस्कार माझ्या पुढील वाटचालीसाठी नवीन संकल्प देणारा आहे मी माझ्या कार्यातून ग्रामीण विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण कौशल्य विकास आणि उत्तम जीवनमूल्य देण्यासाठी अखंड प्रयत्न करत राहीन**

**निकाल विलंब**

एखाद्या खटल्याची सुनावणी पूर्ण झाल्यानंतरही उच्च न्यायालयांकडून निकाल देण्यास होणाऱ्या दीर्घ विलंबाबद्दल सर्वोच्च न्यायालयानं चिंता व्यक्त केली आहे. अशा विलंबामुळे याचिका दाखल करणाऱ्यांचा न्याय व्यवस्थेवरील विश्वास कमी होतो असं मत न्यायालयानं नोंदवलं आहे. तीन महिन्यांच्या आत निकाल देण्यात आला नाही तर असा प्रलंबित खटला रजिस्ट्रार जनरलना उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांसमोर सादर करावा लागेल आणि उच्च न्यायालय त्यांना 2 आठवड्याच्या आत निकाल देण्यास सांगेल. जर 2 आठवड्याच्या आत त्या खंडपीठाला निकाल देता आला नाही तर तो

खटला दुसऱ्या खंडपीठाकडे सोपवला जाईल, असं न्यायमूर्ती संजय करोल आणि प्रशांत कुमार मिश्रा यांच्या खंडपीठानं म्हटलं आहे.

**जरांगे-मुंबई**

मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे यांना पूर्वपरवानगी न घेता मुंबईच्या आझाद मैदानावर आंदोलन करता येणार नाही, असा आदेश मुंबई उच्च न्यायालयानं काल दिला. मुंबईचं दैनंदिन जीवन आणि गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर राज्यातल्या कायदा-सुव्यवस्थेचा विचार करता त्यांना खारघर इथं पर्यायी जागा देण्याचा विचार सरकारनं करावा, असं मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती आलोक आराधे आणि न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्या खंडपीठानं सुचवलं.

**फुले साहित्य**

क्रांतीसुर्य महात्मा फुले आणि ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या विचारांचा वारसा त्यांच्या एकत्रित साहित्याच्या माध्यमातून नव्या पिढीपर्यंत जाईल. या साहित्यामुळे नवीन पिढीला प्रेरणादायी दिशा मिळून यशस्वी होण्याचा मार्ग मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. महात्मा जोतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या समग्र वाङ्मयाचे प्रकाशन आणि इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या नवीन संकेतस्थळाचं उद्घाटन काल मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झालं; त्यावेळी ते बोलत होते. यामध्ये महात्मा फुले यांचे 23 आणि सावित्रीबाई फुले यांचे 14 ग्रंथ, त्यांचा पत्रव्यवहार तसेच महत्त्वपूर्ण दस्तऐवजांचा समावेश आहे. पुण्यातील महात्मा फुले वाडा आणि साताऱ्यातील नायगाव येथील सावित्रीबाईंच्या शिल्पसृष्टीची रंगीत छायाचित्रे हे या ग्रंथाचं वैशिष्ट्य आहे.

**कृत्रिम फुले वापर**

कृत्रिम फुलांच्या वापरामुळे फुल शेती धोक्यात येऊन शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या पुढाकाराने पर्यावरण, पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय विकास मंत्री पंकजा मुंडेंना यासंदर्भात पत्र दिलं असून आवश्यक कायदेशीर उपाययोजना करत कृत्रिम फुलांच्या वापरावर बंदी घालण्याची मागणी केली आहे.

**रानभाज्या महोत्सव-पालघर**

अनुसूचित जमातीतील लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी आणि त्यांच्या पारंपरिक रानभाज्या, औषधी गुणधर्म असलेल्या पदार्थांचा सार्वजनिक प्रसार आणि प्रसिद्धी करण्याच्या उद्देशानं पालघर जिल्ह्यात रानभाज्या महोत्सवाचं आयोजन करण्यात येणार आहे. जव्हार, मोखाडा, विक्रमगड आणि वाडा या तालुक्यातल्या आदिवासी लाभार्थ्यांना या महोत्सवात सहभागी होता येणार आहे.

**कुत्रा हल्ला-भंडारा**

भंडारा जिल्ह्याच्या पवनी तालुक्यातील कोसरा इथं लहान मुलं खेळत असताना अचानक 20 ते 25 कुत्र्यांच्या समूहाने लहान मुलावर हल्ला केला, त्यामध्ये 4 वर्षीय मुलगा गंभीर जखमी झाला. मुलांची प्रकृती गंभीर असून त्याच्यावर नागपूर येथे उपचार सुरू आहेत. अशा घटना वारंवार घडत असून ग्रामपंचायतीनं याचा बंदोबस्त करणे गरजेचे आहे अशी मागणी होत आहे.

**हवामान**

राज्याच्या सर्व विभागांमध्ये येत्या दोन तीन दिवसात कमी अधिक प्रमाणात पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. कोकणात किनारपट्टीजवळ जोरदार वारे वाहण्याची शक्यता असून बहुतांश ठिकाणी मध्यम तर तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस तर मध्य महाराष्ट्र विदर्भ आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी विजांसह जोरदार पाऊस पडेल, असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.**